**शनिवार दि. ०७.१२.२०१३ रोजी मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी राज्य मुख्य माहिती आयोग व राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठ कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांची बैठक घेतली त्याबाबतचे इतिवृत्त.**

बैठकित खालील मुद्यांवर चर्चा करुन अनुपालनाबाबत सूचना दिल्या.

1. **Pursue with Public Authorities Directions u/s 19 (8) especially sec 4 (1) (a)(b)**

   मुख्य माहिती आयुक्तांनी आतापर्यंत माहिती आयोगाच्या कलम १९ (८) sec ४ (१)(b) अवंलबिण्याबाबत दिलेल्या सूचना काटेकारेपणे पालन होणे गरजेचे आहे त्याबाबत आयोगाने तीन महिन्यातून एकदा पाठपुरावा करावा अशा सूचना दिल्या.

2. **Annual report - preparation work**

   आयोगाचा वार्षिक अहवाल मा.मुख्य माहिती आयुक्तांनी तयार करण्याच्या सूचना दिल्या याबाबत श्री. कदम, कक्ष अधिकारी यांनी सर्व मंत्रालयीन विभागांना सूचना दिल्याचे अवगत केले.

3. **Reminder to government to fill up vacant posts on regular basis.**

   आयोगामध्ये रिक्त असलेल्या पदाबाबत शासनाकडे दोन महिन्यातून एकदा पाठपुरावा करावा अशा सूचना मुख्य माहिती आयुक्त यांनी श्री. जाधव, कक्ष अधिकारी (आस्थापना) यांना दिल्या.

4. **व 11 . Recruitment rules and RRs- Get information from other commissions and follow up with government**

   सेवा प्रवेश नियमांबाबत इतर राज्यातील माहिती आयुक्त कार्यालयाकडून त्यांच्या कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी यांच्या सेवा प्रवेश नियमांची माहिती घ्यावी तसेच ज्यांचेकडून माहिती प्राप्त झाली आहे, त्याबाबत अभ्यास करण्याच्या सूचना मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी दिल्या.

5. **Proposal for restructuring of commission- follow** up

   आयोगात सध्याचा स्टाफ कमी असल्याने आयोगाच्या प्रत्येक खंडपीठात ३४ अधिकारी /कर्मचारी असावेत असा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्याबाबत आपल्या कार्यालयाकडून शासनाकडे पाठपुरावा करावा असे मुख्य माहिती आयुक्त यांनी श्री. गावडे, सचिव यांना सुचविले.

6. **व 10. Penalty monitoring and Upload information regarding penalty etc.**

   आयोगाने आतापर्यंत विविध विभागाच्या जन माहिती अधिकारी यांना जी शास्ती केलेली आहे. त्याबाबत त्या त्या विभागाकडून अनुपलान अहवालाबाबत पाठपुरावा करण्याबाबत व त्याचा रेकॉर्ड

अपडेट करुन संकेत स्थळावर टाकण्याबाबत कार्यवाही करण्यात सूचना  मुख्य माहिती आयुक्त  यांनी दिल्या.

**7. Video conferencing in other benches**

व्हिडीओ कॉन्फरन्सिंगची सुविधा माहिती आयोगाच्या इतर खंडपीठात सुरु करण्याबाबत आयटीचे अधिकारी/कर्मचारी यांचेबरोबर पाठपुरावा करण्याबाबत सूचना दिल्या.

**8. A Website-Corrections, government circulars/case laws to b uploaded Pdf format**

आयोगाच्या सकेतस्थळावर माहिती अधिकार अधिनियमाच्या सुधारित शासन निर्णयाबाबत तसेच केस लॉ बाबत लिंक आहेत त्या संबंधित संकेतस्थळाची देखभाल करणाऱ्या श्रीमती पूर्वा पाटील यांच्याशी समन्वय साधून त्याचे पीडीएफ फॉरमॅट अपडेट करण्याबाबत पाठपुरावा करण्याच्या सूचना दिल्या.

**9. Paperless office**

मा. मुख्य माहिती आयुक्त यांच्यासुनावणी कक्षेत दुसरे संगणक स्क्रिन लावले असले तरी त्यामध्ये काही त्रुटी आहे त्यासांठी नवीन संगणकाची व्यवस्था करण्याची व पेपरलेस ऑफीस लवकरच कार्यन्वित होईल या दृष्टिने कार्यवाही करण्याच्या सूचना मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी दिल्या.

**12. Ventilation new computer and court room computer, air conditioner and intercom – Direct line for CIC**

मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी श्री. गाडडे, सचिव यांना बांधकाम विभागातील अधिकाऱ्यांशी संपर्क साधून कार्यवाही करण्याच्या सूचना मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी दिल्या.

**13. Online filing of rti applications/appeals-follow up**

याबाबत पाठपुरावा करण्याच्या सूचना मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी दिल्या.

**14. Review pending rti applications on weekly basis.**

आयोगाच्या कार्यालयातील माहिती अर्जाबाबत आढावा  घेतला त्यावर श्री. जाधव, कक्ष अधिकारी यांनी आयोगात येणारे माहिती अर्जास एका आठवडयाच्या आत  माहिती पुरविण्यात येते असे सांगितले. त्यावर  मुख्य माहिती आयुक्त यांनी समाधान व्यक्त केले.

**15. Sec 14 (1) (b)- 17 items –Review updating with concerned compilations on our website.**

माहिती आयोगाच्या सेक्शन ४ (१) (b) बाबतची माहिती संकेतस्थळावर प्राधान्याने अपडेट करण्याबाबत मुख्य माहिती आयुक्तांनी सूचना दिल्या.

**16. Departmental action against PIOs-monitoring (/sect 20 (2))**

मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी जुन २०१२ पासून ज्या ज्या विभागातील प्रकरणांमधील जन माहिती अधिकारी यांचेविरुध्द विभागीय चौकशी करण्याचे आदेश दिलेले आहेत त्याचे रेकॉर्ड एकत्रित करुन ते संकेतस्थळावर टाकावे अशा सूचना दिल्या.

**17. Six Bundle system to be maintained by each desk.**

सहा गठ्ठा पध्दत ही आयोगामध्ये अवलंबण्यात यावी अशा सूचना मुख्य माहिती आयुक्तांनी दिल्या.

**18. Capacity building –Trg of SPIOs, AAs in cascade model- ATIs to first Dist Resource Persons**

DPDC अंतर्गत नाविन्यपूर्ण योजनांचा सदराखाली RTI संदर्भात प्रशिक्षणासाठी काही खर्च करता येईल, याबाबत सर्व जिल्हाधिकारी यांना पत्र लिहिणे आवश्यक असल्याचे मा. मुख्य माहिती आयुक्त यांनी सांगितले.

**19. Weeding of Records.**

सन २०११ पर्यंतच्यासर्व द्वितीय अपील धारिकांचे weeding करुन झाले असल्याचे श्री. जाधव, कक्ष अधिकारी यांनी सांगितले.

Pending issues with government-

**1. Creation of posts inspections wing for each region and HQs and Purchase of Staff car for inspection wing**

आयोगाच्या निरिक्षण पथकासाठी वेगळी पदे निर्माण करण्याबाबत शासनास पाठविलेल्या प्रस्तावाचा पाठपुरावा करण्याबाबत मुख्य माहिती आयुक्तांनी सूचना दिल्या.

**2. Finalization of Rules under RTI Act**

माहितीचा अधिकार अधिनियम द्वितीय अपील नियम अंतिम मंजूरीबाबत शासनाकडे पाठपुरावा करण्याबाबत सूचना दिल्या.

3. **Pursue with Chief Secretary actions to be taken by him as directed vide Do dated 18th June 2012**

मुख्य माहिती आयुक्तांनी आतापर्यंत दि. १८.०६.२०१२ रोजी काढलेल्या अर्धशासकीय पत्रावर पुन्हा स्मरणपत्रे पाठवून पाठपुरावा करावा करण्याबाबत सूचना दिल्या.

4. **Sanction of Staff as per new staffing pattern**

आयोगात सध्याचा स्टाफ कमी असल्याने आयोगाच्या प्रत्येक खंडपीठात ३४ अधिकारी /कर्मचारी असावा असा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आलेला आहे. त्याबाबत आपल्या कार्यालयाकडून शासनाकडे पाठपुरावा करावा असे मुख्य माहिती आयुक्त यांनी श्री. गावडे, सचिव यांना सुचविले.

वरील चर्चा झाल्यानंतर बैठक समाप्त झाल्याचो जाहिर केले.

**( रत्नाकर गायकवाड )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**